महानगरपालिका नगरसेवक स्वेच्छा
निधीमधून घ्यावयाची कामे
मार्गदर्शक तत्वे

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग,
परिपत्रक क्रमांकः एएमसी १४२००/२२६४/प्रक्र.१४४/नवि-२४
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २६ फेब्रुवारी २००१

**प्रस्तावना :** राज्यातील महानगरपालिकांच्या अंदाजपत्रकात प्रत्येक वर्षी नगरसेवक स्वेच्छा निधी म्हणून ठराविक रकमेची तरतूद करण्यात येते. या तरतुदीतून प्रत्येक नगरसेवकांसाठी ठरविण्यात आलेल्या निधीतून आपापल्या प्रभागातील कोणती कामे घेण्यात यावीत याबाबत संबंधित नगरसेवक महानगरपालिकेस सूचवू शकतात. नगरसेवकांनी अशी कामे सूचविल्यानंतर त्या कामावर या निधीतून घ्यावयाच्या कामासंबंधीची पुढील कार्यवाही विहित नियम व प्रचलित कार्यपध्दतीनुसार महानगरपालिकेतर्फे केली जाते. नगरसेवक निधीतून कोणती कामे घेण्यात यावीत हे संबंधीत नगरसेवक स्वेच्छा निर्णयावर अवलंबून असले तरी सदरचा निधी हा महानगरपालिकांच्या एकत्रित महसूल निधीतील असल्याने त्याचा विनियोग योग्य कामावरच व्हावा तसेच तो अनाठाई नसावा यास्तव या निधीचा विनियोग करणेबाबत मार्गदर्शक तत्वे ठरवून देणेची बाब शासनाचे विचाराधीन होती.

परिपत्रक : राज्यातील महानगरपालिकामध्ये प्रत्येक नगरसेवकांस नगरसेवक स्वेच्छा निधी म्हणून महानगरपालिका अंदाजपत्रकात करण्यात येत असलेल्या तरतुदीचा विनियोग योग्य अशा नागरी सेवा सुविधावर व्हावा यास्तव या निधीतून कोणती कामे घेण्यात यावीत व कोणती कामे घेण्यात येऊ नयेत याचा उल्लेख सोबतच्या अनुक्रमे प्रपंत्र "अ" व "ब" मध्ये करण्यात आला आहे.

सोबतच्या प्रपत्र "अ" मध्ये नमूद केलेली कामेच नगरसेवक स्वच्छा निधीतून घ्यावयाची असून या कामापैकी कोणती कामे आपापल्या स्वेच्छा निधीतून घेण्यात यावीत हे ठरविण्याचा स्वेच्छा निर्णय संबंधित नगरसेवकांचा असेल. मात्र अशा कामाची अंदाजित किंमत दोन लाख रुपयांपेक्षा जास्त असता कामा नये.

नगरसेवकांनी त्यांच्या स्वेच्छा निर्णयानुसार प्रपत्र "अ" मध्ये नमूद केलेल्या कामापैकी कोणती कामे घेण्यात यावीत हे सुचविल्यानंतर अशी कामे महानगरपालिका इतर विकास कामे ज्या विहीत नियम व कार्यपध्दतीनुसार करते त्याच नियम व कार्यपध्दतीनुसार महानगरपालिकेनेच करावयाची आहेत.

उक्त निधी सोबतच्या प्रपत्र "अ" मध्ये नमूद केलेल्या बाबींवरच खर्च केला जाईल व तो प्रपत्र "ब" मध्ये नमूद केलेल्या बाबींवर खर्च केला जाणार नाही याची सर्व महानगरपालिकांनी दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

र. चि. ओपे
( र.चि.ओपे )
महाराष्ट्र शासनाचे उपसचिव

प्रत,

आयुक्त, सर्व महानगरपालिका,
नगर सचिव, सर्व महानगरपालिका
प्रधानसचिव-१, प्रधानसचिव-२, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
सर्व सहसचिव/उपसचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ००३२
कार्यासन अधिकारी, नवि-४, २०, २१, २२, २३, २५, २६, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ००३२
निवडनस्ती नावि-१४

## स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत नगरसेवक स्वेच्छानिधीतून घेण्यासाठी अनुज्ञेय कामांची यादी ( परिशिष्ट -अ )

१) रस्त्याची कामे :-
   १) लहान रस्ते
   २) मिसिंग लिंक
   ३) छोटे पूल
   ४) रस्त्याचे डांबरीकरण
   ५) नळकांडी पूल
   ६) साकव
   ७) नाल्याची कामे
   ८) रस्त्यावरील मोरीची कामे
   ९) लहान नाल्यावर फरशी बांधणे
   १०) फूट ब्रीज
   ११) ड्रेनेजची कामे
   १२) सिमेंट प्लगची कामे

२) पाणीपुरवठ्याची कामे :-
   १) ज्या वसाहतींसाठी नळपाणी पुरवठा योजना अगोदरच झाल्या असतील अशा वस्त्यांना जादा पाईप लाईन टाकून पाणीपुरवठा करण्यासंबंधीची कामे, तसेच पाण्याची टाकी बांधणे.
   २) विंधन विहिरी
   ३) शहरी भागातील पाणीपुरवठ्यांची कामे

३) सामाजिक सभागृह / समाज मंदिर

४) व्यायामशाळा

५) स्मशानभूमीची कामे

६) चावडी

७) सार्वजनिक वाचनालयाचे बांधकाम

८) प्राथमिक शाळांच्या नवीन खोल्या

९) प्राथमिक शाळा खोलीची विशेष दुरुस्ती

१०) ज्या झोपडपट्ट्यांमध्ये (घोषित गलिच्छ वस्त्या) सार्वजनिक सुविधा निर्माण करण्याची शासनाची जबाबदारी आहे अशा ठिकाणी सार्वजनिक उपयोगाकरिता स्नानगृहे, संडास, अस्तित्वात असलेल्या संडासांची दुरुस्ती, पायवाटा, सार्वजनिक स्वरुपाचा पाणीपुरवठा व दिवाबत्ती अशी सामान्य स्वरुपाची कामे.

११) महापालिका क्षेत्रातील उपकर आकारण्यात आलेल्या चाळीमधील (सेस्ड् बिल्डींग) गल्ल्या, गटारे, सार्वजनिक स्वच्छतागृहे बांधणे व त्याची दुरुस्ती. दुरुस्त न होणाऱ्या संडासांची पुनर्बांधणी व दुरुस्ती.

सार्वजनिक न्हाणी गृहे बांधणे, त्याचप्रमाणे पिण्याच्या पाण्याच्या पध्दतीच्या (Piped Water Systems) दुरुस्तीची कामे. मात्र चाळीच्या इमारतीच्या दुरुस्ती, भिंतींना प्लॅस्टर लावणे, रंग लावणे, विद्युतीकरण करणे अशी कामे या अंतर्गत घेता येणार नाहीत.

१२) महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी / शासकीय / महानगरपालिका यांच्या मालकीच्या जागांवरील घोषित गलिच्छ वस्त्यांत (Declared Slums) सार्वजनिक उपयोगाची (Public Utility) म्हणून बालवाडया, व्यायामशाळा इ. सुविधांची कामे.

१३) महानगरपालिका परिवहन सेवेच्या बस थांब्यावर निवारे (Sheds) बांधणे. (हया थांब्यांची परिरक्षणे, देखभाल इ. जबाबदारी परिवहन सेवेची राहील आणि त्यासाठी हया कार्यक्रमातून निधी दिला जाणार नाही.)

१४) अनुसूचित जाती / अनुसूचित जमातीच्या वस्त्यांमधील समाजमंदीरांच्या दुरुस्तीची कामे.

१५) महानगरपालिकेच्या मालकीच्या इमारतींमधील अशी विशिष्ट दुरुस्तीची कामे जसे की, गल्ल्या, गटारे, सार्वजनिक स्वच्छतागृहे व संडास यांची दुरुस्ती व पिण्याच्या पाण्याच्या पध्दतीच्या (Piped Water Systems) दुरुस्तीची कामे, मात्र अशा इमारतींची, भिंतींना प्लॅस्टर लावणे, रंग लावणे, विद्युतीकरण करणे अशी कामे या अंतर्गत घेता येणार नाहीत.

१६) महानगरपालिकेच्या रुग्णालयात जेथे अगोदरच अशी सोय नाही तेथेच पोस्टमार्टम रुमचे बांधकाम.

१७) १) महानगरपालिका क्षेत्रातील शासकीय चाळी व यामधील वरील क्र. १७ मध्ये उल्लेखिलेली दुरुस्तीची कामे.

२) महानगरपालिकेच्या मालकीच्या शाळांच्या विशेष दुरुस्तीची कामे. खाजगी इमारतीतील महानगरपालिकेच्या शाळेच्या दुरुस्तीची कामे मात्र या कार्यक्रमाखाली घेता येणार नाहीत.

३) खालील अटींच्या अधीन राहून महानगरपालिका क्षेत्रात पाळणाघरे बांधण्याची कामे:-

अ) हया पाळणाघराची मालकी महानगरपालिकेची राहील.

ब) अशी कामे घेण्यापूर्वी पाळणाघरे चालविण्याची तसेच त्यांची देखभाल / परिरक्षण करण्याची व्यवस्था प्रथम ठरविण्यात यावी.

क) दिनांक ९/१२/१९८७ च्या शासन निर्णयानुसार बालवाडया चालविण्यासाठी ज्या अटींवर रजिस्टर्ड / विश्वस्त संस्थांना चालविण्यास देण्याची मुभा आहे त्याच धर्तीवर ही पाळणाघरे विश्वस्त संस्थांना चालविण्यास देण्यात येतील.

ड) पाळणाघर चालविण्यासाठी पाळणे व इतर साहित्य इ. खर्च त्या रजिस्टर्ड / विश्वस्त संस्थांना करावा लागेल.

१८) पोलीस चौकीचे बांधकाम गृह विभागाने विहीत केलेल्या आर्थिक व अन्य निकषाप्रमाणे असावे.

१९) महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिकेच्या मालकीच्या बगीच्यामध्ये पुढे नमूद केलेल्या प्रकारचे पक्क्या स्वरुपाचे बसवायचे (फिक्सचर्स ) खेळाचे साहित्य बसविणे.

१) लोखंडी घसरगुंडी

२) ~~इलेक्ट्रल~~ घसरगडा

3) रैनबो

४) बास्केट बॉल पिलर्स
५) लोखंडी पाळणे इ.

२०) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्र. जीईएन १०८९/१४८७/सीआर९९/८९/नवि-१६, दिनांक १८ ऑगस्ट, १९८९ अन्वये घेण्यात येणारी नागरी सामाजिक वनीकरणाची कामे.

२१) महानगरपालिकेत लोक वर्गणीपोटी सुचविलेल्या तरतुदी.
उदा. पाणी पुरवठयाच्या लाईन, वीज पुरवठा इ.साठी अनामत ठेव (Security Deposit) भरणे इ.

२२) महानगरपालिका क्षेत्रात मोकळया जागेचे मैदानात / उद्यानात रुपांतर करणे व त्यास तारेचे कुंपण करणे (मोकळया जागेचे मैदानात / उद्यानात रुपांतर करणे व तारेचे कुंपण घालणे ही कामे वेगवेगळी न समजता एकाच कामाचा भाग म्हणून समजण्यात यावी.) जुन्या कुपंणाऐवजी नवीन कुंपण घालणे या कामात अनुदेय रहाणार नाही.

२३) महानगरपालिका क्षेत्रातील नद्या, खाडया येथे जलवाहतुकीच्या उपयोगासाठी सध्या उतारु धक्का अस्तित्वात नाही तेथे उतारु धक्के बांधणे, या धक्क्यांची देखभाल करण्याची जबाबदारी महानगरपालिकेची राहील.

२४) डोंगर उतारावर जेथे घोषित गलिच्छ वस्त्या असतील तेथे डोंगरावरील दरडी कोसळू नयेत म्हणून संरक्षक भिंत बांधणे तसेच समुद्राच्या वा नदीकाठी जेथे घोषित गलिच्छ वस्त्या असतील तेथे संरक्षक भिंती बांधणे.

२५) महानगरपालिका यांच्या मालमत्तेवर किंवा प्रकल्पांवर अतिक्रमण न होण्याच्या दृष्टीने कंपाऊंड बांधणे.

२६) महानगरपालिका क्षेत्रात स्मशानभूमीमध्ये खालिलप्रमाणे कायमस्वरुपाच्या सुविधा पुरविणे :-
अ) लोकांना थांबण्यासाठी शेडस् बांधणे.
ब) लोकांना बसण्यासाठी बाकडी टाकणे.
क) हातपाय धुण्यासाठी पाणी पुरवठयाची सोय करणे.
ड) आवश्यकतेप्रमाणे प्रेतांच्या दहनासाठी स्टँड बांधणे.

२७) महानगरपालिका क्षेत्रात नद्या व तळी येथे सार्वजनिक उपयोगासाठी कपडे धुण्यासाठी घाट बांधणे.

२८) महानगरपालिकांच्या हद्दीत सार्वजनिक उपयोगासाठी संडास बांधणे. हे संडास महानगरपालिका यांच्या मालकीचे असतील व त्यांच्या देखभालीची जबाबदारी संबंधित संस्थेला घ्यावी लागेल. तसेच हे संडास सार्वजनिक उपयोगासाठी उपलब्ध असावेत.

२९) घोषित केलेल्या गलिच्छवस्त्यांमध्ये म्हाडा किंवा महानगरपालिका यांनी बांधलेल्या जुन्या सार्वजनिक संडासाची दुरुस्ती करणे.

३०) सार्वजनिक उपयोगासाठी मुताऱ्या बांधणे.

३१) प्राथमिक शाळा खोल्यांच्या आवारात संडास / मुतारी बांधणे.

३२) डोंगरी भागातील रस्त्यांच्या वळणावर, नदीच्या काठावर व उघडया विहिरीवर संरक्षक भिंती / कठडे बांधणे :-

सदर कामांच्या देखभालीची जबाबदारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांची राहील. त्याप्रमाणे त्या संस्थांकडून देखभाल करण्याचे हमीपत्र घेण्यात यावे.

३३) महानगरपालिकांच्या तसेच शासन मान्यताप्राप्त अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांसाठी संगणक खरेदी, संगणकाच्या देखभाल दुरुस्तीची जबाबदारी संबंधित शाळांची राहील.

३४) दिनांक २७ जानेवारी, २००१ पुर्वी अनधिकृत वस्त्यांमध्ये नगरसेवक निधीतून केलेल्या कामाच्या देखभाल दुरुस्तीसाठी.

---- ----

## परिशिष्ट - ब

## नगर सेवकांच्या स्थानिक विकास कार्यक्रमाच्या मार्गदर्शक तत्वात बसत नसणा-या कामांची नमुना यादी

१. जिल्हा नियोजन व विकास मंडळाच्या अखत्यारीत नसलेली कामे,
उदा. कोणत्याही प्रकारच्या कार्यालयीन इमारती,ग्रामपंचायत भवन,निवासस्थाने, विश्रामगृहे,टी.व्ही.सेंटर,बचत भवन इत्यादी इमरतींच्या खर्चासाठी पूरक निधी (ही सर्व राज्यस्तरीय कामे आहेत.)

२. खाजगी संस्थांची/सहकारी संस्थांची/वैयक्तीक लाभधारकांची कामे.

३. रु.२.०० लाखापेक्षा जास्त अंदाजित खर्चाची म्हणजे मोठया स्वरुपाची कामे, उदा.स्टेडियमचे बांधकाम

४. कोणत्याही प्रकारची (प्राथमिक शाळाखोलीची व विशिष्ट वस्त्यातील समाजमंदिराची विशेष दुरुस्ती वगळून) दुरुस्तीची कामे.

५. एखाद्या मोठ्या कामाला कमी पडणारी पूरक म्हणून तरतूद

६. एखादया मोठ्या कामसाठी निरनिराळया स्त्रोतातून निधी मिळवण्याच्या प्रयत्नात एक स्त्रोत म्हणून हया कार्यक्रमाखाली तरतूद सुचविणे.

७. मोठया कामांचे (रु.२.०० लाखाच्या वरील) भाग करुन ती लहान कामे म्हणून घेणे.

८. खाजगी संस्थांना/सहकारी संस्थांना अनुदान

९. घरकुले.

१०. स्मारके/स्मृती.

११. होडण्या,वीजखांब इत्यादी प्रकारची स्टॉक म्हणून खरेदी.

१२. प्राथमिक शाळाखोली सोडून इतर शाळा/विद्यालये/महाविद्यालये यांच्या इमारती, त्यांना कुंपण घालणे इत्यादी

१३. रस्त्यांचे पुर्नडांबरीकरण करणे

१४. हॉटमिक्स,हॉटलेड खरेदी.

१५ अनधिकृत वस्त्यामध्ये कोणत्याही कामासाठी वापरता येणार नाही.

-15-

महानगरपालिका नगरसेवक स्वेच्छा
निधीमधून घ्यावयाची कामे
मार्गदर्शक तत्वे

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग,
पूरक परिपत्रक क्रमांकः एएमसी १४२००/२२६४/प्रक्र.१४४/नवि-२४
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : २८ जून २००१

कार्यालय ...
क्रमांक :- 16616.F
दिनांक :- 15-7-2..

पहा :-(१) शासन परिपत्रक क्रमांक एएमसी १४२००/२२६४/प्रक्र.१४४/नवि-२४,दि.२६ फेब्रुवारी २००१
(२) आयुक्त,पुणे महानगरपालिका,पुणे यांचे अर्धशासकीय पत्र क्रमांक पीएमसी/एमसी/१४, दि. १२ जून २००१

**प्रस्तावना :** राज्यातील महानगरपालिकांमध्ये प्रत्येक नगरसेवकांस नगरसेवक स्वेच्छा निधी म्हणून महानगरपालिका अंदाजपत्रकात करण्यात येत असलेल्या तरतुदीचा विनियोग योग्य अशा नागरी सेवा सुविधांवर व्हावा यास्तव या निधीतून कोणती कामे घेण्यात यावीत, व कोणती कामे घेण्यात येऊ नयेत, याबाबत दि.२६ फेब्रुवारी २००१ च्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यात आली होती. यासंबंधात आयुक्त,पुणे महानगरपालिका यांनी उक्त शासन निर्णयान्वये ठरविलेली मार्गदर्शक तत्वे ही नागरी विभागाची गरज भागविण्यास पुरेशी नाहीत असे निदर्शनास आणून खालील कामांचा नगरसेवक स्वेच्छा निधीतून घ्यावयाच्या कामात अंतर्भाव करण्यात यावा असा प्रस्ताव सादर केला होता :-

१) मनपाच्या जागेत विद्युत व्यवस्था,पोलस् बसविणे
२) रस्त्यांचे पुर्नडांबरीकरण करणे
३) मनपाच्या ताब्यातील मोकळया जागेमध्ये, आरक्षण नियमास अधिन राहून, बगिचा करणे, खेळणी बसविणे
४) मनपाच्या जागेत ठिकठिकाणी लोखंडी/सिमेंट बाके बसविणे (रहदारीला अडथळा न करता)
५) मनपाच्या जागेत स्युअर ट्रॅप बसविणे.

सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**पूरक परिपत्रक :** शासन परिपत्रक क्रमांक एएमसी १४२००/२२६४/प्रक्र.१४४/नवि-२४,दि.२६ फेब्रुवारी २००१ च्या "नगरसेवक स्वेच्छा निधीतून घेण्यासाठी अनुज्ञेय कामांची यादी" (परिशिष्ट "अ") मध्ये खालील पाच कामांचा समावेश करण्यात येत आहे.

१) मनपाच्या जागेत विद्युत व्यवस्था,पोलस् बसविणे
२) रस्त्यांचे पुर्नडांबरीकरण करणे

/H2/ /MS/
नगर महानगर पालिका

३) मनपाच्या ताब्यातील मोकळया जागेमध्ये, आरक्षण नियमास अधिन राहून बगिचा करणे,खेळणी बसविणे

४) मनपाच्या जागेत ठिकठिकाणी लोखंडी/सिमेंट बाके बसविणे (रहदारीला अडथळा न करता)

५) मनपाच्या जागेत स्युअर ट्रॅप बसविणे.

नगरसेवक स्वेच्छा निधीच्या मार्गदर्शक तत्वात बसत नसणा-या कामांची यादी परिशिष्ट "ब" मधील अनु.क्र १३ वगळण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( तु. प. केळकर )
कार्यासन अधिकारी

प्रत,

आयुक्त, सर्व महानगरपालिका,
नगर सचिव, सर्व महानगरपालिका
प्रधानसचिव-१,प्रधानसचिव-२,नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई - ४०० ०३२
सर्व सहसचिव/उपसचिव,नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई-४०० ००३२
कार्यासन अधिकारी,नवि-४,२०,२१,२२,२३,२५,२६ ,नगर विकास विभाग,मंत्रालय, मुंबई-४०० ००३२
निवडनस्ती नवि-२४

**राज्यातील महानगरपालिकांच्या वार्षिक अंदाजपत्रकात राखून ठेवण्यात येणा-या <u>नगरसेवक स्वेच्छा निधीची मर्यादा ठरविणेबाबत</u>**

**महाराष्ट्र शासन**
नगर विकास विभाग
शासन परिपत्रक क्रमांक: एएमसी-१४२००/२२६४/प्रक्र१४४/नवि-२४
मंत्रालय,मुंबई - ४०० ०३२,
दिनांक :- १ जानेवारी, २००१

**पहा :-** शासन परिपत्रक क्रमांक: एएमसी-१४२००/२२६४/प्रक्र१४४/नवि-२४, दिनांक २६ फेब्रुवारी २००१

**<u>प्रस्तावना</u> :-** राज्यातील महानगरपालिकांच्या अंदाजपत्रकात प्रत्येक वर्षी नगरसेवक स्वेच्छा निधी म्हणून ठराविक रकमेची तरतूद करण्यात येते. या तरतुदीतून प्रत्येक नगरसेवकांसाठी ठरविण्यात आलेल्या निधीतून आपापल्या प्रभागातील कोणती कामे घेण्यात यावीत याबाबत संबंधित नगरसेवक महानगरपालिकेस सूचवू शकतात. नगरसेवकांनी अशी कामे सूचविल्यानंतर त्या कामावर या निधीतून घ्यावयाच्या कामासंबंधीची पुढील कार्यवाही विहित नियम व प्रचलित कार्यपध्दतीनुसार महानगरपालिकेतर्फे केली जाते. नगरसेवक निधीतून कोणती कामे घेण्यात यावीत हे संबंधीत नगरसेवकांच्या स्वेच्छा निर्णयावर अवलंबून असले तरी सदरचा निधी हा महानगरपालिके०च्या एकत्रित महसूल निधीतील असल्याने त्याचा विनियोग योग्य कामावरच व्हावा तसेच तो अनाठाई नसावा . यास्तव या निधीतून कोणती कामे घेण्यात यावीत व कोणती कामे घेण्यात येऊ नयेत याबाबतची मार्गदर्शक तत्वे दि.२६ फेब्रुवारी २००१ च्या परिपत्रकान्वये विहीत करण्यात आलेली आहेत.

राज्यातील विविध महानगरपालिकांतर्फे नगरसेवक स्वेच्छा निधी म्हणून अंदाजपत्रकात राखून ठेवण्यात येणा-या निधीबाबत असे निदर्शनास आले आहे की नगरसेवक निधी उपलब्ध करुन देताना महानगरपालिकांनी आपापल्या मर्जीनुसार निर्णय घेतलेला आहे. त्यासाठी कोणतेही निकष विचारात घेण्यात आल्याचे दिसून येत नाही किंवा तो एकूण उत्पन्नाशी निगडीत असाही नाही. जसे की बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे नगरसेवक स्वेच्छा निधी म्हणून प्रतिवर्षी प्रत्येकी रु. २०.०० लाख निधी उपलब्ध करुन देण्यात येतो तर नवी मुंबई महानगरपालिकेतर्फे रु.३०.०० लाख देण्यात येतो. **पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत तर स्वेच्छा निधी ठेवण्यातच आलेला नाही.** नाशिक, पुणे, उल्हासनगर महानगरपालिका यांनी अनुक्रमे प्रती नगरसेवक रु. २५.०० लाख, रु.११.०० लाख व रु.१०.०० लाख निधी ठरवून घेतलेला आहे. यावरुन असे दिसून येईल की काही महानरपालिकांनी उत्पन्न कमी असूनही नगरसेवक स्वेच्छा निधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध करुन दिलेला आहे. परिणामी उर्वरित निधीतून इतर प्रमुख बाबींवर खर्च

करण्याचे नियोजन करताना या महानगरपालिकांना खूपच अडचणीचे ठरु शकते. वास्तविक पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य, रस्ते इत्यादी मुलभूत सोयी सुविधा पुरविणे ही तर महानगरपालिकांची प्राथमिक जबाबदारी आहे अशी कामे ही खर्चिक असतात यास्तव ती महानगरपालिकेच्या एकत्रित निधीतूनच करणे व्यवहार्य ठरते. यासाठी पुरेशी तरतूद अर्थसंकल्पात करणे आवश्यक रहाते. नागरिकाच्या सोईसाठी त्याच्या मागणीनुसार अथवा नगरसेवकाच्या इच्छेनुसार, प्रभागात घेण्यात येणारी कामे ही तातडीच्या स्वरुपाची व कमी खर्चाची असतात. यास्तव, या कामांसाठी सध्या काही महानगरपालिकांतर्फे (उत्पन्न मर्यादित असताना) मोठया प्रमाणावर उपलब्ध करुन देण्यात येत असलेला निधी समर्थनिय ठरत नाही. नगरसेवक स्वेच्छा निधीची मर्यादा महानगरपालिकेच्या उत्पन्नाशी निकडीत ठेवल्यास नगरसेवक स्वेच्छा निधीमध्ये एकसूत्रता/नियंत्रण राहू शकेल. तसेच महानगरपालिकांच्या उत्पन्नात जसजशी वाढ होत जाईल त्याप्रमाणात या निधीमध्येही वाढ होईल. यास्तव नगरसेवक स्वेच्छा निधीची मर्यादा महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या आधारे निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**परिपत्रक :** राज्यातील महानगरपालिकांतर्फे वार्षिक अंदाजपत्रकात राखून ठेवण्यात येणारा नगरसेवक स्वेच्छा निधी महानगरपालिकांच्या वार्षिक उत्पन्नाच्या जास्तीत जास्त २ टक्के नगरसेवक स्वेच्छा निधी म्हणून त्यांच्या वार्षिक अंदाजपत्रकात राखून ठेवून तो समप्रमाणात एकूण नगरसेवकांत विभागून देण्यास खालील अटीना अधिन शासनाची मान्यता देण्यात येत आहे :-

(अ) उक्त २ टक्के प्रमाणे निश्चित केलेला नगरसेवक स्वेच्छा निधी हा कमाल मर्यादित राहील. अस्तित्वातील प्रथेनुसार महानगरपालिका सध्या जो निधी उपलब्ध करुन देतात व पुढेही तेवढाच निधी उपलब्ध करुन देणार असतील आणि असा निधी वरील सुत्रानुसार येणा-या निधीपेक्षा कमी असल्यास तो वाढविण्याचे बंधन महापालिकांवर राहाणार नाही.

(ब) असा निधी उपलब्ध करुन देण्यास महानगरपालिका तयार नसल्यास तसे करण्याचे ही महानगरपालिकांवर बंधन राहणार नाही.

(क) उक्त २ टक्के प्रमाणे निधी अंदाजपत्रकात राखून ठेवून उपलब्ध करुन देण्याचा निर्णय महानगरपालिकांनी सन २००२-२००३ या आर्थिक वर्षापासून लागू करावा व तशी तरतूद अंदाजपत्रकात करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(रामानंद तिवारी)

**( रामानंद तिवारी )**
**महाराष्ट्र शासनाचे प्रधान सचिव**

प्रत,

मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
आयुक्त, सर्व महानगरपालिका,
नगर सचिव,सर्व महानगरपालिका
सहसचिव/सर्व उपसचिव,नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई-४०० ००३२
कार्यासन अधिकारी,नवि-४,२०,२१,२२,२३,२५,२६ व ३१ ,नगर विकास विभाग,मंत्रालय,
मुंबई-४०० ००३२
निवडनस्ती नवि-२४

महानगरपालिका नगरसेवक स्वेच्छा
निधीमधून घ्यावयाची कामे
मार्गदर्शक तत्वे.

## महाराष्ट्र शासन

नगर विकास विभाग,

पूरक परिपत्रक क्रमांक :- एएमसी १४२००/२२६४/प्र.क्र.१४४/नवि-२४

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२. दिनांक :- १० ऑक्टोबर, २००२.

**पहा** :- १) परिपत्रक क्र. एएमसी १४२००/२२६४/प्र.क्र.१४४/नवि-२४ दिनांक २६/२/२००१.

२) पूरक परिपत्रक क्र. एएमसी १४२००/२२६४/प्र.क्र.१४४/नवि-२४ दिनांक २८/६/२००१.

३) आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचे अ.शा. पत्र क्र. मआ/२२१ दिनांक १४/१/२००२.

४) अतिरिक्त आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे पत्र क्र.अति.आयुक्त /प्रकल्प/५६४ दिनांक २१/१/२००२.

**प्रस्तावना** :- राज्यातील महानगरपालिकांमध्ये प्रत्येक नगरसेवकांस नगरसेवक स्वेच्छा निधी म्हणून महानगरपालिका अंदाजपत्रकात करण्यात येत असलेल्या तरतुदींचा विनियोग योग्य अशा नागरी सेवा सुविधांवर व्हावा यास्तव या निधीतून कोणती कामे घेण्यात यावीत व कोणती कामे घेण्यात येऊ नयेत, याबाबत दिनांक २६ फेब्रुवारी, २००१ च्या शासन निर्णयान्वय मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यात आली होती आणि दिनांक २८ जून, २००१ च्या पूरक परिपत्रकान्वये अनुज्ञेय कामांच्य यादीमध्ये (परिशिष्ट "अ") ५ कामांचा समावेश करण्यात आला आहे. आयुक्त, पुणे महानगरपालिका व अतिरिक्त आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी खालील कामांचा नगरसेवक स्वेच्छा निधीतून घ्यावयाच्या कामांत अंतर्भाव करण्यात यावा असा प्रस्ताव सादर केला आहे.

अ) गांडूळ खत प्रकल्प राबविणे.

ब) विभागवार वेगवेगळया खात्यातील कामगारांच्या हजेरी चौक्या तयार करणे किंवा अस्तित्वात असलेल्या चौक्यांची दुरुस्ती करणे (परिशिष्ठ "अ" अनुक्रमांक ११ मध्ये अंतर्भूत करणे)

याशिवाय केंद्र शासनाने नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० ची अंमलबजावणी सर्व महानगरपालिकांवर बंधनकारक केलेली असल्याने त्याची अंमलबजावणी व संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान कार्यक्षमपणे पार पाडण्याचे दृष्टीने यासाठी हाती घ्यावयाची भांडवली खर्चाच्या कामांचा अंतर्भाव अनुज्ञेय कामांमध्य करणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**पुरक परिपत्रक** :- शासन परिपत्रक क्र. एएमसी १४२००/२२६४/प्र.क्र.१४४/नवि-२४ दिनांक २६ फेब्रुवारी, २००१ तसेच समक्रमांकाच्या जून, २००१ च्या पुरक परिपत्रकान्वये नगरसेवक स्वेच्छा निधीमधून घेण्याच्या अनुज्ञेय कामाच्या यादी (परिशिष्ट "अ") मध्ये खालील दोन कामांचा समावेश करण्यात येत आहे.:-

अ) नागरी घन कचरा व्यवस्थापन व निर्मुलन यांचे अंतर्गत तसेच संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान यांचे अंतर्गत घ्यावयाची सर्व प्रकारची भांडवली खर्चाची कामे.

ब) विभागवार वेगवेगळया खात्यातील कामगारांच्या हजेरी चौक्या तयार करणे किंवा अस्तित्वात असलेल्या चौक्यांची दुरुस्ती करणे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( प्र. मा. माळवदकर )
महाराष्ट्र शासनाचे, उप सचिव

प्रत,

आयुक्त, सर्व महानगरपालिका.
नगर सचिव, सर्व महानगरपालिका.
प्रधान सचिव-१, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई. - ४०० ०३२.
सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
सर्व सह सचिव / उप सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
कार्यासन अधिकारी, नवि-४, २०, २१, २२, २३, २५, २६ नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०२.
निवडनस्ती, नवि-२४

महानगरपालिका नगर सेवक स्वेच्छा निधीमधुन
घ्यावयाची कामे - मार्गदर्शक तत्त्वे.
नवीन कामांचा अंतर्भाव व खर्चाची मर्यादा
वाढविणेबाबत.

## महाराष्ट्र शासन

नगर विकास विभाग

पूरक परिपत्रक क्रमांक :- एएमसी १४२००/२२६४/प्र.क्र.१४४/(भाग-3)/२०००/नवि-२४

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक :- ०३ मार्च, २००३

वाचा :-(१) शासन निर्णय ,नगर विकास विभाग क्र.एएमसी १४२००/२२६४/प्रा.क्र.१४४/
नवि-२४,दि. २६. २. २००१ व २८.६. २००१ व दिनांक १०.१०.२००२

(२) अतिरिक्त आयुक्त,बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे पत्र क्र. अति.आयुक्त/प्रकल्प/
वि/५८२८. दि.१४.८.२००२ व आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे पत्र
क्र. एमजीसी /ए/१०३४. दि.९.१.२००३ चे पत्र.

CA(F) 10/1/03

**प्रस्तावना :** राज्यातील महानगरपालिकांमध्ये प्रत्येक नगरसेवकांस नगरसेवक स्वेच्छा निधी म्हणून महानगरपालिका अंदाजपत्रकात करण्यात येत असलेल्या तरतुदींचा विनियोग योग्य अशा नागरी सेवा सुविधांवर व्हावा यास्तव या निधीतून कोणती कामे घेण्यात यावीत व कोणती कामे घेण्यात येऊ नये, याबाबत दिनांक २६ फेब्रुवारी, २००१ च्या शासन परिपत्रकान्वये मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यात आली होती आणि दिनांक २८ जून,२००१ व दिनांक १० ऑक्टोबर,२००२ च्या पूरक परिपत्रकान्वये अनुज्ञेय कामांच्या यादीमध्ये (परिशिष्ठ "अ") अनुक्रमे ५ व २ कामांचा समावेश करण्यात आला आहे. आयुक्त आणि अतिरिक्त आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी नगरसेवक स्वेच्छा निधीची मर्यादा, वापर आणि या निधीतून घ्यावयाच्या अतिरिक्त कामांबाबत खालील प्रस्ताव शासनास सादर केला आहे:-

(अ) प्रत्येकी रुपये २ लाखापेक्षा अधिक रक्कमेची कामे नगरसेवक निधीतून न करण्याची घातलेली अट शिथील करुन ती रुपये ५ लाखापर्यन्त वाढविण्यात यावी.

(ब) एखाद्या नगरसेवकाच्या स्वेच्छा निधी दुस-या नगरसेवकाच्या मतदार संघातील कामासाठी वापरण्याबाबत निश्चित सूचना देण्यात याव्यात.

(क) खालील कामांचा नगरसेवक स्वेच्छा निधी मधुन घ्यावयाच्या कामात अंतर्भाव करण्यात यावा:-

१) शहर स्वच्छता अभियानाचा एक भाग म्हणून थुंकदाण्या, कचरा कुंड्या / प्लॅटफार्म्स इ. खरेदी करणे / बनविणे व त्यांचा विशिष्ट ठिकाणी पुरवठा करणे.

२) शहराच्या स्वच्छतेत बाधा आणणारे शहरातील घरगल्ल्यामधील दुरुस्ती व स्वच्छता.

३) महानगरपालिका रुग्णालयात आवश्यक असलेली छोटी मोठी यंत्रसामुग्री खरेदी करणे.

४) रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या पदपथाचे पुनर्स्थापन करणे

५) सौंदर्यीकरणाचा एक भाग व वृक्षसंवर्धन म्हणून महानगरपालिकेच्या जागेवर लावण्यात येणाऱ्या झाडांना लालमाती व शेणखत यांचा पुरवठा करणे.

सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**पूरक परिपत्रक:-** बृहन्मुंबई महानगरपालिकेतील नगरसेवकांना नगरसेवक स्वेच्छा निधी महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या प्रमाणात मिळत असतो. सदर निधी इतर महानगरपालिकांच्या तुलनेत जास्त प्रमाणात मिळतो. वास्तव प्रत्येकी रुपये २ लाखापेक्षा अधिक रक्कमेची कामे नगरसेवक स्वेच्छा निधीतुन न करण्याची घातलेली अट शिथील करुन ती रुपये ५ लाखापर्यंत वाढविण्यास मान्यता देण्यात येत आहे. **ही बाब फक्त बृहन्मुंबई महानगरपालिकेसाठीच लागू आहे.**

०२. मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ कलम ११८ मध्ये उल्लेखिलेल्या प्रयोजनांसाठी महानगरपालिका निधी वापरण्यात यावा अशी तरतुद आहे. या तरतुदीनुसार एखादा नगरसेवक त्याच्या प्रभागामध्ये स्वेच्छा निधी खर्च करण्यास असमर्थ असेल तर सदरहू निधी शेजारच्या प्रभागात तेथील नगरसेवकाच्या सहमतीने खर्च करु शकेल. **ही बाब फक्त बृहन्मुंबई महानगरपालिकेसाठीच लागू आहे.**

०३ शासन परिपत्रक, क्रमांक: एफसी - १४२०००/२२६४/प्र.क्र.१६८/नवि-२४, दिनांक २६ फेब्रुवारी, २००१ च्या "नगरसेवक स्वेच्छा निधीतून घेण्यासाठी अनुज्ञेय कामांची यादी" (परिशिष्ट "अ") मध्ये खालील ५ कामांचा समावेश करण्यात येत आहे.-

१) शहर स्वच्छता अभियानाचा एक भाग म्हणून थुंकदाण्या, कचरा कुंड्या / प्लास्टिक्स इ. खरेदी करणे / बनविणे व त्यांचा विशिष्ट ठिकाणी पुरवठा करणे.

२) महानगर स्वच्छता राखा अभियानात सार्वजनिक मुतारल्यामधील दुरुस्ती व स्वच्छता.

३) महानगरपालिका रुग्णालयात आवश्यक असलेली छोटी मोठी यंत्रसामुग्री खरेदी करणे.

४) रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या पदपथाचे पुनर्स्थापन करणे

५) सौंदर्यीकरणाचा एक भाग व वृक्षसंवर्धन म्हणून महानगरपालिकेच्या जागेवर लावण्यात येणाऱ्या झाडांना लालमाती व शेणखत यांचा पुरवठा करणे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( प्र. मा. मालवदकर )

उपसचिव

जन-४०-५००(१०)



# बृहन्मुंबई महानगरपालिका

परिपत्रक

२००२-२००३

क्र.सीए/एफएसडब्ल्यू/४, दि. १९/०४/२००२

महानगरपालिका नगरसेवक स्वेच्छा निधीमधून घ्यावयाच्या कामासंबंधी मार्गदर्शक तत्वे महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रक क्र.एएमसी १४२००/२२६४/प्रक्र.१४४/नवि-२४, दि.२६ फेब्रुवारी २००१ व पूरक परिपत्रक क्र.एएमसी १४२००/२२६४/प्रक्र.१४४/नवि-२४ दि.२८ जून २००१ अन्वये निश्चित करण्यात आलेली आहेत.

मुंबई महानगरपालिका आयुक्तांच्या दि.१.४.२००२ क्र.एमजीसी/एफ/१३१६ आदेशा अन्वये नगरसेवक निधीचा वापर हा महाराष्ट्र शासनाने निश्चित केलेल्या कामांवरच व्हावा तसेच सदर परिपत्रकामध्ये समाविष्ट नसलेल्या इतर कोणत्याही बाबीवर (अपवाद म्हणून) खर्च होणार नाही याची सर्व खाते प्रमुखांनी/विभाग सहाय्यक आयुक्तांनी दक्षता घ्यावी.

दि.१.४.२००२ पासून वरील परिपत्रकानुसार अंमलबजावणी करण्यात यावी व नगरसेवक निधीच्या वापरासंबंधीची यापूर्वीची सर्व परिपत्रके रद्दबातल समजण्यात यावीत.

शासनाच्या परिपत्रकाच्या छायांकित प्रती सोबत जोडण्यात आल्या आहेत.

सही/- दि.१८.०४.२००२

(प्र. सी. नागवेकर)

प्रमुख लेखापाल (वित्त)

परिपत्रक

२००२-२००३

क्र.सीए/एफएसडब्ल्यू/४, दि. १९/०४/२००२

---

आपल्या माहिती आणि योग्य त्या कार्यवाहीकरिता रवाना.

22.8-02

प्रमुख लेखापाल (वित्त) यांजकरिता

C:sda/FSW/12

जोन - २०२-२५००



परिपत्रक

क्र.. प्र.ले/एफएसडब्ल्यू/२३ दि.०२.०९.२००२

विषय - मुंबई स्वच्छता अभियानाशी निगडीत कामे प्रत्येक मतदार संघातील अनपेक्षीत कामे करण्यासाठी असलेल्या ठोक तरतुदीमधून ( महानगरपालिका नगरसेवक निधीमधून ) करण्यासंबंधी

महानगरपालिकेने दि. १५ ऑगस्ट, २००२ या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून "स्वच्छ मुंबई अभियान" राबविण्याचा संकल्प सोडला आहे. अशा स्वच्छता विषयक विशेष अभियाना-अंतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. अशा प्रकारच्या अभियानामध्ये वेळी प्रसंगी अशासकीय संस्थांचे विशेष सहकार्य घेतले जाते व त्या त्या विभागातील नगरसेवकांच्या प्रोत्साहनाने हा उपक्रम एक सेवाभावी कर्तव्य म्हणून पार पाडला जातो. या कार्यक्रमात सहभागी संस्थांना स्वच्छता विषयक लागणारी साधनसामुग्री व सेवा जर घनकचरा व्यवस्थापन खात्याअंतर्गत अर्थसंकल्पिय तरतूदीच्या कमतरतेमुळे किंवा तरतुदी अभावी देणे शक्य नसेल परंतु नगरसेवकांनी नगरसेवक निधीतुन सदर कामे करण्याची इच्छा दर्शविली असेल अशावेळी खालील कामे घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१) शहर स्वच्छता अभियानाचा एक भाग म्हणून थुंकदाण्या कचरा कुंडया/प्लॅटफॉर्म्स इत्यादी खरेदी करणे/बनविणे व त्यांच्या विशिष्ट ठिकाणी पुरवठा करणे.

२) शहराच्या स्वच्छतेत बाधा आणणारे शहरातील घरगल्ल्यांमधील दुरुस्ती व स्वच्छता.

वरील कामे स्वच्छता अभियानाशी निगडीत असुन ती अत्यंत तातडीने करणे आवश्यक असल्यामुळे नगरसेवक निधीतुन ती हाती घेण्यास महानगरपालिका आयुक्तांनी क्र.एमजीसी/एफ/३२७८ दि.२३.८.२००२ च्या आदेशान्वये मान्यता दिली आहे.

सर्व खाते प्रमुख व सहा. आयुक्त यांनी महानगरपालिका आयुक्तांच्या आदेशाची नोंद घेऊन शासनाच्या या बाबतच्या मार्गदर्शक तत्वास अधिन राहुन कार्यवाही करावी.

| | | |
|---|---|---|
| सही/-३१.८.२००२ | सही/-०२.०९.२००२ | सही/-०२.०९.२००२ |
| (प्र. सी. नागवेकर) | ( गौतम चटर्जी ) | (विद्याधर कानडे) |
| प्रमुख लेखापाल (वित्त) | अतिरिक्त आयुक्त (पुर्व उपनगरे) | अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) |

परिपत्रक

क्र.प्र.ले/एफएसडब्ल्यू/२३ दि.०२.०९.२००२

प्रत (जादा प्रतीसह ) माहितीसाठी आणि आवश्यक त्या कार्यवाहीकरिता रवाना.

१०/०९/२००२

प्रमुख लेखापाल (वित्त) यांजकरिता.

---x---

जा.क्र.-२३५-२५००

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## परिपत्रक

२००२-२००३

सीए/एफएस/डब्लू/२८ दि.२८-९-२००२

विषय :- महानगरपालिका नगरसेवक स्वेच्छा निधीतून
घ्यावयाची कामे - मागदर्शन तत्वे

महाराष्ट्र शासनाच्या वरील विषयाच्या परिपत्रकान्वये राज्यातील महानगरपालिकांमध्ये प्रत्येक नगरसेवकांस नगरसेवक स्वेच्छा निधीमधून नागरिक सुविधेची कामे आपापल्या प्रभागात करता येतात. सदर निधीतून कोणती कामे करण्यात यावीत व कोणती कामे करण्यात येऊ नयेत हे शासनाने निश्चित केलेले आहे व त्याप्रमाणे महानगरपालिकेच्या परिपत्रक क्रमांक सीए/एफएसडब्ल्यू/४, दि.१९-४-२००२ अन्वये शासनाच्या आदेशानुसार अंमलबजावणी करण्यासाठी सर्व खाते प्रमुख / विभाग सहाय्यक आयुक्त यांना कळविण्यात आले आहे.

शासनाच्या मार्गदर्शक तत्वामध्ये काही अशी कामे की, जी मुंबई महानगरपालिकेच्या अनिवार्य किंवा स्वेच्छाधीन कर्तव्यांमध्ये अंतर्भूत नाहीत अशी कामे नगरसेवक निधीतून घेण्यात येऊ नयेत उदा :-

| परिपत्रकातील अनु.क्र. | कामाचा तपशील |
|---|---|
| १/६ | साकव |
| २/२ | विंधन विहिरी |
| ६ | चावडी |
| १३ | महानगरपालिका परिवहन सेवेच्या बस थांब्यावर निवारे (शेड) बांधणे |
| १८ | पोलीस चौकीचे बांधकाम |
| २० | नागरी सामाजिक वनीकरणाची कामे |
| २३ | नद्या, खाड्या येथे जल वाहतुकीच्या उपयोगासाठी उतारु धक्के बांधणे |
| २७ | नद्या व तळी येथे सार्वजनिक उपयोगासाठी कपडे धुण्यासाठी घाट बांधणे |

त्याऐवजी काही अत्यावश्यक कामे जी विद्यमान मार्गदर्शक तत्वामध्ये अंतर्भूत नाहीत परंतु ती पार पाडणे आवश्यक आहे अशा कामाचा मार्गदर्शक तत्वामध्ये अंतर्भाव करण्यासाठी शासनाला स्वतंत्रपणे विनंती करण्यात आली आहे. शासन निर्णय प्राप्त होताच योग्य ते परिपत्रक निर्गमित करण्यात येईल.

संबंधित खाते प्रमुख / सहाय्यक आयुक्त / विभाग लेखा अधिकारी यांनी वरील आदेशाची नोंद घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी.

| सही/- | सही/- |
|---|---|
| (विद्याधर कानडे) | (के.सी.श्रीवास्तव) |
| अति. आयुक्त (प्रकल्प) | महानगरपालिका आयुक्त |

## परिपत्रक

२००२ - २००३

सीए/एफएस/डब्लू/२८ दि.२८-९-२००२

—————————————- यांना प्रत (———— जादा प्रतींसह) माहितीसाठी व योग्य कार्यवाहीसाठी पाठविली आहे.

प्रमुख लेखापाल (वित्त) यांजकरिता.
३/१०/२००२

आव २५८-२५००

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

परिपत्रक

२००२-०३

क्र.सीए/एफएसडब्ल्यू/३८ दिनांक ०४.१२.२००२

विषय : महानगरपालिका नगरसेवक स्वेच्छा निधीतून घ्यावयाची कामे - मार्गदर्शक तत्वे.

संदर्भ: परिपत्रक क्र.सीए/एफएसडब्ल्यू/२८ दिनांक २७.०९.२००२.

उपरोक्त विषयावरील परिपत्रक क्र.सीए/एफएसडब्ल्यू/२८ दिनांक २७.०९.२००२ अन्वये जी कामे महानगरपालिका नगरसेवक निधीतून करता येणार नाही अशा कामांची यादी प्रसारित करण्यात आली होती. त्यामध्ये अनु.क्र.२१२ 'विंधन विहिरी' बांधणे हे काम देखील अंतर्भूत होते.

परंतु, आता मुंबई शहराची वाढती लोकसंख्या व पावसाची अनिश्चितता या गोष्टी विचारात घेता पाण्याची गरज भागविण्याच्या दृष्टीने 'विंधन विहिरी बांधणे' हे काम महापालिकेच्या अनिवार्य कर्तव्यांमध्ये अंतर्भूत करण्याचे ठरविले असून ते महापालिकेच्या नगरसेवक निधीतून करण्यास हरकत नाही. सदर विंधन विहिरींचा वार्षिक देखभालीचा किंवा दुरुस्तीचा खर्च संबंधित संस्था किंवा गृहनिर्माण संस्था यांनी करावयाचा आहे. त्यामुळे अशा प्रकारचे प्रस्ताव संबंधित प्राधिका-यांच्या मान्यतेसाठी सादर करण्यापूर्वी देखभाल, दुरुस्ती आणि इतर आवर्ती खर्च संबंधित संस्था व सहकारी गृहनिर्माण संस्था स्वतःच्या निधीमधून भागवतील या बाबतचे संमतीपत्र संबंधित संस्था, गृहनिर्माण संस्था यांचेकडून सहाय्यक अभियंता (परिरक्षण) यांनी प्राप्त करुन प्रस्तावासोबत सादर करावे.

संबंधित खाते प्रमुख/सहाय्यक आयुक्त/लेखा अधिकारी यांनी वरील आदेशाची नोंद घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी.

| | |
|---|---|
| सही/-४.१२.२००२ | सही/-४.१२.२००२ |
| (विद्याधर कानडे) | (के.सी.श्रीवास्तव) |
| अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) | महापालिका आयुक्त |

परिपत्रक क्रमांक २००२-०३

कमांक सीए/एफएसडब्ल्यू/३८ दिनांक ०४.१२.२००२

----------याना(--------जादा प्रतीसह) माहितीसाठी व योग्य कार्यवाहीसाठी पाठविली आहे.

५/१२/२००२.

प्रमुख लेखापाल (वित्त) यांजकरिता

—o—

जन ३६०..२५०८

## बृहन्मुंबई महानगरपालिका

परिपत्रक २००२-०३
क्रमांक : सीए/एफआरडी/४४ दि. १३.०३.२००३.

विषय : महानगरपालिका नगरसेवक निधीतून घ्यावयाची कामे — मार्गदर्शक तत्वे.

संदर्भ : महाराष्ट्र शासन - नगरविकास विभाग - पूरक परिपत्रक क्र.एएमसी/१४२००/२२६४, २०००/ प्रति-२४ प्र.क्र.१४४(भाग-३) दिनांक ३ मार्च २००३.

महाराष्ट्र शासनाच्या वरील विषयाच्या परिपत्रकान्वये राज्यातील महानगरपालिकांमध्ये प्रत्येक नगरसेवकांस नगरसेवक स्वेच्छा निधीतून यावाबतच्या मार्गदर्शक तत्वानुसार ठराविक रकमेची कामे आपापल्या मतदारसंघात करता येतात.

महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वामध्ये अंतर्भूत नसलेली परंतु ती पार पाडणे आवश्यक आहेत अशी काही कामे सदर परिपत्रकामध्ये अंतर्भूत करावीत म्हणून शासनास विनंती करण्यात आली होती. शासनाच्या वरील संदर्भातील पूरक परिपत्रकान्वये खालील ५ कामांचा, अनुज्ञेय कामांच्या यादी (परिशिष्ट 'अ'). मध्ये समावेश करण्यात आलेला आहे.

१) शहर स्वच्छता अभियानाचा एक भाग म्हणून थुंकदाण्या, कचरा कुंड्या, प्लॅटफॉर्म, इत्यादी खरेदी करणे/ बनविणे व त्यांचा विशिष्ट ठिकाणी पुरवठा करणे.
२) शहराच्या स्वच्छतेत बाधा आणणारे शहरातील धरगल्ल्यांमधील दुरुस्ती व स्वच्छता.
३) महानगरपालिका रुग्णालयात आवश्यक असलेली छोटी मोठी यंत्रसामुग्री खरेदी करणे.
४) रस्त्यांच्या दुतर्फा असलेल्या पदपथांचे पुनस्थापन करणे.
५) सौंदर्यीकरणाचा एक भाग व वृक्ष संवर्धन म्हणून महानगरपालिकेच्या जागेवर लावण्यात येणाऱ्या झाडांना लाल माती व शेणखत यांचा पुरवठा करणे.

शासनाच्या वरील परिपत्रकान्वये प्रत्येकी रु.२ लाखापेक्षा अधिक रकमेची कामे न करण्याची घातलेली अट शिथिल करुन ती रु.५ लाखापर्यंत वाढविण्यात आली आहे. त्याप्रमाणे नगरसेवक निधीतून एखादा नगरसेवक त्याच्या प्रभागामध्ये निधी खर्च करण्यास असमर्थ असेल तर सदरहू निधी शेजारच्या प्रभागात तेथील नगरसेवकाच्या सहमतीने ~~आणि संबंधित आयुक्तांच्या आदेशाने~~ खर्च करता येईल.

संबंधित खाते प्रमुख/ सहाय्यक आयुक्त/विभाग लेखा अधिकारी यांनी वरील आदेशाची नोंद घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी.

प्रमुख लेखापाल (वित्त)

अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प)

शेटा उान - ४४० - २५०(१)

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## परिपत्रक

२००८-२००९

क्र. प्रले/एफएसडब्ल्यू/३६ दि. ०२/०१/२००९

विषय : महापालिका नामनिर्देशित सदस्यांना नगरसेवक निधी मिळण्याबाबत

संदर्भ . महानगरपालिकेचा दि. १५ डिसेंबर २००८ चा ठराव क्र.९८३

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निर्वाचित नगरसेवकांना त्यांच्या मतदार संघातील लोकाग्रहाची, नागरी सुविधेची अनपेक्षीत स्वरुपाची विविध कामे पार पाडता यावीत म्हणून 'प्रत्येक मतदार संघामध्ये अनपेक्षीत कामांसाठी ठोक तरतूद' (नगरसेवक निधी) या सेवा शिर्षाखाली अर्थसंकल्पीय तरतूद उपलब्ध करुन दिली जाते. तथापि प्रचलीत पध्दतीनुसार महापालिकेच्या नामनिर्देशित नगरसेवकांना असा निधी उपलब्ध करुन दिला जात नव्हता. महानगरपालिका नामनिर्देशित सदस्यांना सभागृहातील इतर सदस्यांप्रमाणे नगरसेवक निधी मिळावा यास्तव सन २००३ पासुन नामनिर्देशित सदस्य आग्रही होते.

आता महाराष्ट्र शासनाने असे निर्देश दिले आहेत की मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ या अधिनियमामध्ये 'नगरसेवक' या शब्दाची व्याख्या स्पष्ट करण्यात आली आहे. सदर व्याख्येनुसार नगरसेवक निधी हा 'निर्वाचित' आणि 'नामनिर्देशित' नगरसेवक या दोघांकरिता लागु होतो असे दिसून येते. सदर वस्तुस्थिती लक्षात घेता मुंबई महानगरपालिकेच्या निर्वाचित नगरसेवकांप्रमाणे नामनिर्देशित नगरसेवकांस सदर निधी उपलब्ध करुन देण्यास शासनाची हरकत नाही.

त्याच प्रमाणे महानगरपालिकेच्या दि. १५ डिसेंबर २००८ च्या ठराव क्र.९८३ अन्वये नामनिर्देशित नगरसेवकांना यापुढे बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात विविध नागरी विकास कामे निर्वाचित स्थानिक नगरसेवकाचे 'ना हरकत प्रमाणपत्र' प्राप्त केल्यानंतर आणि नगरसेवक निधी वापरासंबंधिच्या राज्य शासनाने निर्गमित केलेले दि.२६ फेब्रुवारी २००१ चे परिपत्रक क्रमांक एएमसी/१४२००/२२६४/प्र.क्र.१४४ नवि.-२४, आणि दि.२६ जून २००१ च्या पुरक परिपत्रकाअन्वये प्रसृत करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांच्या अधीन राहून पार पाडता येतील.

Scanned by CamScanner

निर्वाचित नगरसेवकांप्रमाणेच पाच नामनिर्देशित नगरसेवकांना सन २००८-०९ या अर्थसंकल्पीय वर्षा पासून 'प्रत्येक मतदार संघामध्ये अनपेक्षित कामांसाठी ठोक तरतूद' (नगरसेवक निधी) या सेवा शिर्षाखाली प्रत्येकी रु.३५ लाख याप्रामणे एकूण रु. १ कोटी ७५ लाख इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

निधी संकेतांक - ११

खाते संकेतांक - १२

कॉस्ट सेंटर क्र. - १०००१२००००

जी.एल. कोड - ५९१०००२२८ ते ५९१०००२३२

अनपेक्षित कामांचा खर्च - १ ते ५

'प्रत्येक मतदार संघामध्ये अनपेक्षित कामांसाठी ठोक तरतूद' (नगरसेवक निधी) या सेवाशिर्षातून पार पाडण्यात येणा-या कामांच्या मंजुरीच्या कार्यपद्धती प्रमाणेच सदर निधीतून पार पाडण्यात येणा-या कामांच्या मंजुरीची कार्यपद्धती राहिल, तर सदर कामांच्या देयकांची पडताळणी प्रमुख लेखापाल (वित्त) यांच्या कार्यालयातील एफ.एस.डब्ल्यू. या उपविभागामार्फत करण्यात येईल.

सर्व खाते प्रमुख, सहाय्यक आयुक्त व संबंधित अधिकारी यांनी वरील निर्देशांची नोंद घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी.

३०/१२/०८

प्रमुख लेखापाल (वित्त) | अति. आयुक्त (प्रकल्प) | म.न.पा. आयुक्त

Scanned by CamScanner

जा.क्र.22-2500(2)

# बृहन्मुंबई महानगरपालिका

**-परिपत्रक-**

**२०१०-२०११**

**प्रले/एफडीटी/१, दि. ०७.०४.२०१०.**

**विषय:-** पत्र कार्यादेश (Letter work order) देण्यास तसेच प्रकल्प कामांची छोट्या रकमेच्या कामांत विभागणी करण्यास (Splitting of work) प्रतिबंध करण्याबाबत...

**संदर्भ :-** १) एमसी/१०९०/अे/प्र.अ.(द), दि.१८.८.२०००
२) प्रअ/१२१२०/एक, दि.२३.८.२०००
३) एएमसी/पी/८४८, दि.०१.१०.२००२
४) सीए/एफएआर/३२, दि.९.१.२००८

---

कंत्राटदारांना पत्र कार्यादेश (Letter work order) देऊ नयेत अशा सूचना वारंवार संदर्भाधीन परिपत्रकाद्वारे संबंधिताना देण्यात आलेल्या आहेत.

दि.१.४.२००७ पासून महापालिकेत सॅप कार्यप्रणाली अंमलात आली आहे व सर्व कार्यादेश संगणक प्रणालीतून देणे आता अत्यावश्यक झालेले आहे याबाबतचे निदेश संदर्भ क्र.४ येथील परिपत्रकान्वये खातेप्रमुखांना देण्यात आलेले आहेत. तथापि, अजूनही पत्र कार्यादेश देऊन कामे पार पाडली जात असल्याचे निदर्शनास येते.

पत्र कार्यादेश दिल्यामुळे व त्याची सॅप संगणक प्रणालीत नोंद नसल्यामुळे महापालिकेला अशाप्रकारे अर्थसंकल्पीय तरतुदीपेक्षा जास्त खर्च करण्यात आलेल्या प्रस्तावांपोटीचे नेमके दायित्त्व किती आहे याचा अंदाज येत नाही. याचा परिणाम आर्थिक नियोजनावर होऊ शकतो. महापालिकेची सध्याची आर्थिक स्थिती विकट असल्याने खर्चावर कठोर नियंत्रण ठेवणे अत्यंत गरजेचे झाले आहे. तथापि, अशा प्रकारे विहित कार्यपध्दतीचे पालन न करता पत्र कार्यादेशाद्वारे कामे पार पाडण्यात आली तर एकूण दायित्वाचा अंदाज न आल्याने प्रकल्प कामांसाठी निधी उपलब्ध करुन देणे तसेच खर्चावर नियंत्रण देखील ठेवणे शक्य होणार नाही. त्यामुळे **यापुढे पत्र कार्यादेश देण्यावर प्रतिबंध घालण्यात येत आहे.**

एखाद्या अपवादात्मक परिस्थितीत पत्र कार्यादेश देणे अत्यावश्यक असल्यास त्यांस संबंधित अतिरिक्त आयुक्त / महापालिका आयुक्त यांची विशिष्ट पूर्व मंजुरी प्राप्त करणे आवश्यक राहील.

याचप्रमाणे, बऱ्याच प्रकरणात मोठ्या रकमेच्या प्रकल्प कामांची छोट्या छोट्या कामात विभागणी करुन ही कामे किरकोळ कामे कंत्राटदाराच्या कंत्राट अटीनुसारच्या एका कामाच्या रकमेच्या कमालमर्यादित बसवून अशा कामांना स्थायी समितीसारख्या वरिष्ठ प्राधिकरणाची मंजुरी टाळण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे. ही बाब अतिशय गैर व गंभीर



Scanned by CamScanner

स्वरुपाची आहे. वास्तविक पाहता मोठ्या रकमांच्या प्रकल्पकामांची छोट्या रकमेच्या कामात विभागणी करण्यास (Splitting of work) संदर्भ क्र.१ व ३ येथील परिपत्रकान्वये प्रतिबंध करण्यात आला आहे. परंतु त्याची दखल घेतली जात नाही असे निदर्शनास येते. त्यामुळे स्थायी समितीसारख्या **वरिष्ठ प्राधिकरणाची मंजुरी टाळण्याच्या दृष्टीने मोठ्या रकमेच्या प्रकल्प कामांची छोट्या छोट्या कामात विभागणी करुन ही कामे किरकोळ कामे कंत्राटदाराच्या कंत्राट अटीनुसारच्या एका कामाच्या रकमेच्या कमालमर्यादेत बसविण्यात येऊ नयेत असे नव्याने निदेश देण्यात येत आहेत.**

एखाद्या अपवादात्मक परिस्थितीमध्ये कामाची किंमत / प्रकल्प खर्च किरकोळ कामे कंत्राटदारांच्या कमाल मर्यादेपेक्षा जास्त असल्यास आणि कामाची विभागणी करणे अत्यावश्यक असल्यास त्यासाठी आयुक्तांची प्रशासकीय पूर्व मंजुरी प्राप्त करणे आवश्यक आहेच परंतु अशा प्रकरणी कामाची विभागणी करण्यासाठी व मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८च्या कलम ६९(क) नुसार ते एक स्वतंत्र कंत्राट समजण्यासाठी **स्थायी समितीची विशेष पूर्व मंजुरी** प्राप्त करणेदेखील आवश्यक राहील.

सर्व संबंधित सहाय्यक आयुक्त तसेच खातेप्रमुख यांनी उपरोक्त निदेशांची नोंद घेऊन त्यांचे काटेकोरपणे पालन करावे.

| सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|
| प्रमुख लेखापाल (वित्त) | अति. आयुक्त (प्रकल्प) | महानगरपालिका आयुक्त |

---

-परिपत्रक-

२०१०-२०११

प्रले/एफडीटी/१, दि. ०७.०४.२०१०.

प्रत ———————— यांना (———— जादा प्रतींसह) माहितीसाठी आणि आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

प्रमुख लेखापाल (वित्त) यांजकरिता



Scanned by CamScanner

प्र. [illegible]

परिपत्रक

२००६-०७

क्र.प्रआ/१३११०/घकव्य/सर्द-१०८१

विषय :- नगरसेवक निधीतुन गृहनिर्माण संस्थांना कचराकुंड्या (डस्टबीन्स) व ट्रॉलीज यांचे वाटप करण्याबाबत.

संदर्भ :- १. महाराष्ट्र शासन - नगरविकास विभाग पुरक परिपत्रक क्र.एएमसी/१४२००/२२६४/प्रक.१४४/भाग-३/२०००/नवि-२४ दि.३ मार्च २००३.

२.सीए/एफआरडी/४४ दि.१३.३.२००३.

महाराष्ट्र शासनाच्या नगरसेवक निधीच्या वापरासंबंधीच्या मार्गदर्शक तत्वामध्ये अंतर्भुत नसलेल्या, परंतु ती पार पाडणे आवश्यक आहेत अशा, काही पार पाडावयाच्या कामाचा, महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाच्या पूरक परिपत्रक क्र.एएमसी/१४२००/२२६४/प्रक.१४४/भाग-३/२०००/नवि-२४ दि. ३ मार्च २००३, अन्वये अनुज्ञेय कामांच्या यादीत (परिशिष्ट-अ) शहर स्वच्छता अभियानाचा एक भाग म्हणून धुंकदाण्या, कचराकुंड्या, प्लॅटफॉर्म इ. खरेदी करणे व बनविणे व विशिष्ट ठिकाणी पुरवठा करणे या कामाचा समावेश करण्यात आल्याबाबत कळविण्यात आलेले होते व त्यानुसार परिपत्रक क्र. सीए/एफआरडी/४४ दि. १३.३.२००३ निर्गमित करण्यात आलेले आहे.

या परिपत्रकाच्या सातत्यात आपणांस कळविण्यात येते की, शहरांत सर्व प्रयत्नांनी स्वच्छता राखण्याकरिता नगरसेवक निधीतून गृहनिर्माण संस्थांना कचराकुंड्या (डस्टबीन्स) व ट्रॉलीज चे वाटप करण्याबाबत मा.आयुक्तांनी दि. २२.७.२००५ रोजीच्या क्र.एमजीसी/एफ/५२८९ अन्वये खालील बाबींसापेक्ष मंजूरी दिलेली आहे.-

१. शहर स्वच्छतेचा भाग म्हणून सहकारी गृहनिर्माण संस्थाना त्यांच्या निवासी इमारतीमधील कचरा साठविण्यासाठी विशिष्ट आकाराच्या कचराकुंड्या, नगरसेवकनिधीतुन महापालिकेतर्फे एकदाच काळजीवाहू उपभोक्ते (care taker) तत्वावर पुरविण्यात येतील. त्यांची देखभाल आणि /अथवा भविष्यात त्या निकामी झाल्यास दुरुस्तीचा खर्च सदर संस्था करतील.
२. सदर कचराकुंड्या महापालिकेतर्फे संस्थांना वापरण्यासाठी देण्यात येत असल्या तरी त्याची मालकी महानगरपालिकेकडेच राहिल व संबंधित सहाय्यक आयुक्त त्याचा तपशील ठेवतील असामध्ये या कचराकुंड्या संस्थाकडे काळजीवाहु उपभोक्ते (care taker) तत्वावर ठेवण्यास देण्यात येत आहेत हे लक्षात घ्यावे.
३. कचराकुंड्या विशिष्ट आकारमानाच्या म्हणजेच १२० लिटर्स, २४० लिटर्स, ६६० लिटर्स क्षमतेच्या व एकसारख्या असतील. तसेच त्यांचा पुरवठा निश्चित करण्यात आलेल्या नोंदणीकृत संस्थामार्फतच करण्यात येईल.

संबंधित खाते प्रमुख / सहाय्यक आयुक्त / विभाग स्तरीय अधिकारी यांनी मा.आयुक्त यांच्या उपरोक्त आदेशाची नोंद घेऊन कार्यवाही करावी तसेच सहाय्यक आयुक्त यांनी

Scanned by CamScanner

आपल्याच विभागातील या [illegible] हस्तांतरित अवगत करावे

सही/- ३० ९.०५ सही/- ३० ९.०५ सही/- सही/-

प्रमुख अभियंता उप आयुक्त अति. आयुक्त ([illegible]) अति. आयुक्त [illegible]

([illegible])

Scanned by CamScanner